# नियमित दिवाणी दावा क्र.१४/२०१९ मधील नि.क्र. २३ वरील आदेश
**(CNR NO MHRG14-0002069-2019)**

१. सदरचा अर्ज वादी यांनी वादी क्र. ५ सुशिला गजानन पाटील, वादी क्र. २ संजय गजानन पाटील व वादी क्र.१० साधना लक्ष्मण पाटील यांचे वारसांना दाव्यात सामील करण्याकरीता दाखल केला आहे.

२. सदर अर्जावर प्रतिवादी यांनी निशाणी ३२ कडे म्हणणे देवून जोरदार हरकत घेतली आहे. त्यांनी पुढे असा युक्तिवाद केला आहे की, सदरचा अर्ज हा खोटा व खोडसाळ आहे. केवळ दावा चालवण्यास उशीर व्हावा या हेतुने वादीने सदरचा अर्ज विलंबाने दिलेला आहे. वादीने विलंबाबाबत दिलेले कारण योग्य नूसन वादीचा अर्ज नामंजूर करणेबाबत विनंती केली आहे. तसेच त्यांनी पुढे असा युक्तिवाद केला की, जर न्यायाचे दृष्टीने सदरचा अर्ज मंजूर करावा असे वादीचे मत झाल्यास वादीवर जास्तीत जास्त खर्च बसवावा.

३. अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रे पाहीली. दोन्ही बाजूंचे वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

४. न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर दाव्यातील वादी क्र. ५ सुशिला गजानन पाटील या दि.११/११/२०१८ रोजी तसेच वादी क्र. २ संजय गजानन पाटील हे दि.२९/०५/२०२१ रोजी व वादी क्र.१० साधना लक्ष्मण पाटील या दि.२८/११/२०१६ मयत झाले असून त्यांचे वारसांना अभिलेखावर घेणे न्यायाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. मयत वादी क्र. ५ सुशिला गजानन पाटील यांना वादी क्र. १ ते ४ हेच वारस आहेत. तसेच मयत वादी क्र. २ संजय गजानन पाटील यांना अर्जात नमूद केल्याप्रमाणे १. श्रीमती शिल्पा संजय पाटील, २.कुमार साहील संजय पाटील व ३. कुमारी तेजल संजय पाटील हे वारस आहेत. त्याचप्रमाणे वादी क्र.१० साधना लक्ष्मण पाटील यांना वादी क्र. ७ ते ९ व ११, १२ हेच वारस आहेत. सदरचा दावा वाटपाकरीता, ठरावाकरीता व मनाई हुकूमाकरीता दाखल केला आहे. त्यामुळे वादी क्र. ५ सुशिला गजानन पाटील, वादी क्र. २ संजय गजानन पाटील व वादी क्र.१० साधना लक्ष्मण पाटील यांचे अर्जात नमूद वारसांना अभिलेखावर घेणे योग्य व संयुक्तिक आहे. करीता वरील बाबींचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

## आदेश

वादीचा अर्ज मंजूर करणेत येत आहे.

WALI NILESH MALAKAPPA
Digitally signed by WALI NILESH MALAKAPPA Date: 2022.02.18 17:27:41 +0530

ठिकाण – उरण (निलेश म. वाली)

दिनांक – १८/०२/२०२२ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उरण.